सल्लागार (कामगार) कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दिनांक :

**विषय : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ कलम ६० (अ) (३) अन्वये जाहीर करावयाची इकडील कार्यालयाकडील माहिती.**

संदर्भ : मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) यांचे पत्र क्र. ४९६, दि.२३/३/०९

विषयांकित प्रकरणी इकडील कार्यालयाकडील माहिती खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | कलम ६० (अ) (३) | माहिती |
|---|---|---|
| १. | महानगरपालिकेचा तपशिल | सल्लागार (कामगार) हे पुणे महानगरपालिकेचे एक स्वतंत्र खाते आहे. या खात्यामार्फत विविध औद्योगिक व कामगार कायद्याची अंमलबजावणी करणे, तसेच मार्गदर्शन करणे, कामगार, विविध कामगार संघटना आणि प्रशासन यांचेशी समन्वय राखून सुदृढ व सौहार्द्याचे संबंध प्रस्थापित करणे आणि समन्वय राखून औद्योगिक शांतता राखणे, त्याचबरोबर कामगार कल्याण योजना राबविणे, माहिती अधिकार अधिनियम, विधानसभा, विधानपरिषद तारांकित, अतारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना, मा. लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचेकडील प्रकरणे आणि लोकशाही दिनामधील तक्रारी, इत्यादीबाबत समन्वय राखून त्यांचे निराकरण करणे. |
| २. | महानगरपालिकेची कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी किंवा तिला सल्ला देण्यासाठी घटित करण्यात आलेली, कोणत्याही नावाने संबोधली जाणारी मंडळे, परिषदा, समित्या व इतर निकाय दर्शविणारे विवरणपत्र मग त्या मंडळाच्या, परिषदांच्या समित्यांच्या व इतर निकायांच्या बैठकी जनतेसाठी खुल्या असोत किंवा नसोत अथवा अशा बैठकींची कार्यवृत्ते जनतेला पाहण्यासाठी उपलब्ध असोत किंवा नसोत | पुणे महानगरपालिका कामगार कल्याण निधी नियमावली, २००५ नुसार कामगार कल्याण निधीची स्थापना मे. राज्य शासनाच्या मान्यतेने केली असून, त्या नियमावलीतील तरतुदीनुसार निधीची अंमलबजावणीकामी मा. महापालिका आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली कार्यकारिणी गठित करण्यात आली आहे. सदर निधी फक्त मनपा कामगारांसाठी असल्याने नागरिकांचा त्यामध्ये सहभाग नाही. कामगार कल्याण निधीच्या सभासदांना इतिवृत्त पाहण्यासाठी कार्यालयात उपलब्ध आहे. |
| ३. | तिच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची निर्देशिका | सोबत परिशिष्ट अ |

| | | |
|---|---|---|
| ४. | महानगरपालिकेच्या कोणत्याही कामाकरिता सवलती, परवानगी किंवा प्राप्तीकरपत्र देण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे तपशिल | इकडील कार्यालयास लागू नाही. |
| ५. | प्रत्येक तिमाहीनंतर दोन महिन्यांच्या आत, त्या तिमाहीचा लेखापरिक्षित ताळेबंद, जमा व खर्च आणि पैशाचा ओघ दर्शविणारे वित्तीय विवरणपत्र आणि वित्तीय वर्ष संपल्यानंतर तीन महिन्यांच्या आत, संपूर्ण वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षित वित्तीय विवरणपत्र. | कल्याण निधीचे जमाखर्चाचे लेखापरीक्षण पूर्वीची हिशेबपत्रके प्रत्येक द्वैमासिक कार्यकारिणीच्या बैठकीत सादर करुन मान्य करण्यात येतात आणि आर्थिक वर्ष पूर्ण होताच तीन महिन्यांत ते सनदी लेखा परीक्षकामार्फत वार्षिक जमानावे पत्रक, तेरीज, ताळेबंद, इत्यादी हिशेबपत्रके तपासणी करुन वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी सादर केली जातात. निधीचे जमाखर्चाचे सन २००९-१० चे लेखापरीक्षणाचे काम सनदी लेखापाल यांचेकडे कार्यवाहीत आहे. |
| ६. | महानगरपालिका पुरवत असलेल्या सर्व सेवा दर्शविणारे विवरणपत्र. | इकडील कार्यालयास लागू नाही. |
| ७. | सर्व योजनांचे तपशिल, प्रस्तावित खर्च, पुरविण्यात आलेल्या प्रमुख सेवांसाठी किंवा पार पाडलेल्या कामांसाठी झालेला प्रत्यक्ष खर्च आणि संवितरित केलेल्या रकमांबाबतचा अहवाल | इकडील कार्यालयास लागू नाही. |
| ८. | महानगरपालिकेने पुरविलेल्या प्रमुख सेवांसाठीच्या किंवा पार पाडलेल्या कामांसाठीच्या अर्थसहाय्य कार्यक्रमांचा तपशिल आणि अशा कार्यक्रमांसाठीचे लाभार्थी निश्चित करण्याची रीत व निकष | इकडील कार्यालयास लागू नाही. |
| ९. | महानगरपालिका क्षेत्राच्या विकासाशी संबंधित बृहत योजनेचा, शहर विकास योजनेचा किंवा इतर कोणत्याही योजनेचा तपशिल. | इकडील कार्यालयास लागू नाही. |
| १०. | राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करेल असे, प्रमुख बांधकामांचे तपशिल तसेच बांधकामाचे मूल्य, पूर्ततेचा कालावधी आणि कराराचा तपशिल याबाबतची माहिति | इकडील कार्यालयास लागू नाही. |
| ११. | महानगरपालिका निधीचा तपशिल, म्हणजेच मागील वर्षामध्ये पुढील बाबींद्वारे मिळालेले उत्पन्न.<br>अ) कर, शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन व परवानगी यातून मिळणारी फी. | इकडील कार्यालयास लागू नाही. |

| | | |
|---|---|---|
| | ब) वसुल न केला गेलेला कर, शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन व परवानगी यातून मिळणारी फी आणि वसुली न करण्यामागची कारणे.<br>क) राज्य शासनाने वसुल केलेल्या करांचा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेला हिस्सा आणि महानगरपालिकेला मिळालेली अनुदाने.<br>ड) महानगरपालिकेला नेमून दिलेल्या किंवा तिच्याकडे सोपविलेल्या योजना, प्रकल्प व आराखडे यांच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने दिलेली अनुदाने , त्यांचे स्वरुप आणि विनियोगाची मर्यादा.<br>इ) जनतेकडून किंवा अशासकीय अभिकरणांकडून मिळालेल्या देणग्या किंवा अंशदाने यामार्फत उभा केलेला पैसा. | |
| १२. | प्रत्येक विभागाला नियतवाटप केलेली वार्षिक अर्थसंकल्पीय तरतूद. | परिशिष्ट ब प्रमाणे |
| १३. | विहित करण्यात येईल अशी इतर माहिती. | -- |

कळावे.

कामगार कल्याणाधिकारी
पुणे महानगरपालिका.

<u>परिशिष्ट ब</u>

**अंदाजपत्रक सन २०१०-११**

| No. क्र. | Budget head / Department Name खातेवारी / विभागाचे नाव | Work / Activity कार्य | Allotted Amount देय रक्कम (लाख) |
|---|---|---|---|
| १. | कायम सेवकवर्ग | सेवकांचे महिनेमहाचे वेतन | ३५.०० |
| २. | संकीर्ण | पोस्ट, स्टेशनरी, लेखनसाहित्य | ०२.०० |
| ३. | कामगार प्रशिक्षण वर्ग | अधिकारी/सेवकांसाठी प्रशिक्षण | १५.०० |
| ४. | खातेनिहाय परीक्षा बक्षिस | हायर व लोअर परीक्षार्थी (क्र.१, २ व ३) यांना रोख स्वरुपात बक्षिसे देणे. | ००.०२५ |
| ५. | सेवापूर्ती समारंभ | दरमहा सेवानिवृत्त सेवकांसाठी सेवापूर्ती समारंभामध्ये शॉल व स्मृतीचिन्ह दिली जातात. | ०३.०० |
| ६. | कामगार कल्याण निधी मनपा वर्गणी | मुंबई प्रांतिक मनपा अधिनियमातील तरतुदीनुसार निर्माण करण्यात आलेल्या कामगार कल्याण निधीच्या विहित उद्देशानुसार विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. | १७.०० |
| ७. | मृत सेवक वारस अर्थसहाय्य | मा. स्थायी समिती ठ.क्र. ११९९ दि.२७/११/०७ अन्वये मृत सेवकांच्या वारसांना मनपा निधीतून आर्थिक सहाय्य रु. ३५०००/- देण्यात येते. | ४९.०० |
| ८. | कामगार आपत्कालीन निधी | आपत्कालीन परिस्थितीत खर्च करण्यात येतो. | २५.०० |
| ९. | अधिकारी/कर्मचारी आरोग्य सशक्तीकरण योजना | वय वर्षे ४०-५० पूर्ण केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी ऐच्छिक व ५० आणि त्यापेक्षा जास्त वय पूर्ण केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी दरवर्षी शारिरीक तपासणी करुन घेणे. | ५५.०० |
| १०. | अपघात शुल्क योजना | पुणे शहरात अपघात झाल्यास व अशा अपघातग्रस्त अत्यवस्थ रुग्णास अतिदक्षता विभागात (आयसीयु) दाखल केल्यास त्यास रक्कम रु. १०,०००/- पर्यंत अपघात शुल्क देण्यात येईल. | २५.०० |
| ११. | आरटीआय लायब्ररी | पुणे महापालिका भवनाच्या तिसऱ्या मजल्यावर आरटीआय ग्रंथालय सुरु करणे आहे. | २५.०० |

## परिशिष्ट अ
## कामगार कल्याण निधी
## पदसिध्द सदस्य

| क्र. | पद | हुद्दा | नाव |
|---|---|---|---|
| १. | अध्यक्ष | मा. महापालिका आयुक्त | श्री. महेश झगडे |
| २. | कार्यकारी अध्यक्ष | मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) | श्री. मच्छिंद्रनाथ देवणीकर |
| ३. | सचिव | मा.सल्लागार (कामगार) | श्री. शिवाजी दौंडकर |
| ४. | खजिनदार | मा. मुख्यलेखापाल | सौ. उल्का कळसकर |

## नियुक्त सदस्य

| क्र | वर्ग व संख्या | सदस्याचे नाव | हुद्दा |
|---|---|---|---|
| १ | वर्ग १ – (१) सदस्य | मा. मोळक ज्ञानेश्वर | उप आयुक्त |
| २ | वर्ग २ – (१) सदस्य | डॉ. श्रीमती घाटगे केतकी | क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी |
| ३ | वर्ग ३ – (२) सदस्य | १.श्री. कामथे अरुण<br>२. श्रीमती सोनवणे संगिता | पर्यवेक्षक<br>ज्यु.ग्रे.लेखनिक |
| ४ | वर्ग ४ – (३) सदस्य | १. श्री. कटके रामभाउ<br>२. श्री. सातपुते नंदकुमार<br>३. श्री. नरसिंगे मधुकर | मोकादम<br>मोकादम<br>बिगारी |